SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२२-२३/30** **दिनांक : 3/6/2023**

# स्मरण परिपत्रक

**प्रति,**

**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था.**

**विषय : आपल्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना / अनुदानित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी संख्येची प्रवर्गनिहाय माहिती सादर करणेबाबत.**

**संदर्भ :**
**१. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२२-२३/०८ दि. ०१/०३/२०२३ रोजीचे या कक्षाचे स्मरण परिपत्रक २.**
**२. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२२-२३/१४५ दि. २७/१२/२०२२ रोजीचे या कक्षाचे स्मरण परिपत्रक १.**
**३. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२२-२३/१४१ दि. २८/११/२०२२ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.**
**४. जा.क्र विशेष कक्ष/२०२२-२३/६३६ दि.१९/०४/२०२२ रोजीचे विशेष कक्षाचे परिपत्रक.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील **सन २०२२-२३** मधील प्रवेशित विद्यार्थी संख्येची माहिती ई-मेल सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार देण्यात यावी असे वरील परिपत्रक, स्मरणपत्राव्दारे व दुरध्वनी मार्फत कळविले होते. परंतू अद्याप आपल्या महविद्यालयाकडून सदर बाबतची माहिती प्राप्त झालेली नाही.

सदर विद्यार्थी संख्येची माहिती शासनास तसेच स्थायी समितीपुढे सादर करण्यास विलंब होत आहे. सदर माहिती **दि. ०५/०६/२०२३** पुर्वी सांख्यिकी कक्षाकडे पाठविण्यात यावी जेणेकरुन विद्यापीठाची माहिती वेळेत सादर करता येईल. नमुद केलेल्या दिनांकापूर्वी आपल्या महाविद्यालयाने माहिती न पाठविल्यास स्थायी समितीच्या नियमानुसार होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार राहील तसेच आपले महाविद्यालय सांख्यिकी माहिती न मिळाल्याच्या यादीमध्ये समाविष्ट करून सदरची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**आपल्या महाविद्यालयाने फक्त सॉप्ट कॉपी ई-मेल आयडीवर पाठविलेली असेल तर सदर माहितीची हार्ड कॉपी विद्यापीठास तात्काळ सादर करावी ही विनंती.**

कळावे.

आपला विश्वासू,

**प्र-कुलसचिव**